# राशिभविष्य - जून, २०१८.

## दादा दामले ( dadadamle@gmail.com)

==========================================

**(१) मेष -** सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव लहरी, अस्थिर, चंचल असा झाला असल्याचे जाणवते. मनस्थिती अस्वस्थ असल्यामुळे कोणी काही समजुतीचे सांगितले तर अपमानास्पद वाटून असह्य मनस्ताप होत असावा, असे वाटते. या राशीची लहान मुले तर अत्यंत व्रात्य, खोडकर अशी झाली असण्याची शक्यता वाटते. हे सर्व हर्षल ग्रहाच्या प्रतापामुळे घडत असले पाहिजे. पण हा हर्षल ग्रह शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अतिशय उपयुक्त होईल. महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या काही मंडळींना नेत्रविकाराचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. तसेच काहींच्या कुटुंबात वाद, भांडणे होणेही संभवते. शिवाय आर्थिक समस्या त्रस्त करीत असतानाच वाढत्या खर्चाची चिंता अस्वस्थ करील. या राशीच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना विविध प्रकारचे लाभ होतील. छुप्या शत्रूंपासून सावध राहा. तसेच बुद्धी विकृत होणार नाही याची काळजी घ्या. राहूमुळे कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. शेतीवाडी असणारांना मात्र काळ अनुकुल व लाभदायक होईल. गुरु ग्रह वक्री असल्याने प्रेमसंबंध व स्नेहसंबंध यात बाधा येणार नाही, याची काळजी घ्या. काहींचे नवे स्नेहसंबंध जुळून येतील. या राशीच्या विवाहेच्छू युवक-युवतींचे विवाह जमून येतील. या राशीच्या काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. या राशीच्या युवकयुवतींना हातचे सोडून नवीन काही करावयाची उर्मी येईल. पण त्यांनी तसे न करता आहे ती नोकरीच मनापासून करावी. यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय, औषध विक्रेते यांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. कुमार्गी मित्रांपासून सावध राहा. आर्थिक व्यवहार नुकसानकारक होणार नाहीत याची काळजी घ्या. श्रद्धेने श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना करा.

**(२) वृषभ -** सर्व प्रकारच्या आरोग्याचे दृष्टीने या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. काही मंडळींना उष्णता विकारांचा आजार त्रस्त करील. तसेच काहींना नेत्रविकार त्रस्त करील. काही मंडळींना अपेक्षाभंग झाल्यामुळे गहरे नैराश्य येईल. काहींना गलितगात्र झाल्यासारखा थकवा येईल. रक्तविकार, हृदयविकार असणारांनी विशेष जपावे. महिन्याच्या उत्तरार्धात काही मंडळीना आर्थिक नुकसान सहन करावे लागेल. काहींना वाढत्या खर्चाची चिंता त्रस्त करील. काहींना हितशत्रूंचा त्रास सहन करावा लागेल. अशा परिस्थितीतही या राशीच्या

काही भाग्यवान मंडळीना भूमिलाभ होणे संभवते. तसेच काही मंडळींना मानाचे स्थान मिळून त्यांची प्रतिष्ठा वाढेल. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-ग्राहकाकडूनच अधिक अर्थलाभ होईल. पण राहूमुळे बंधुसुखात बाधा येणे संभवते. मानसिक उपचार तज्ञ व द्रव पदार्थांचे व्यापारी यांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. अन्य व्यावसायिकांच्या व्यवसायात अस्थिर परिस्थिती निर्माण होईल. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे मन:शांती लाभेल. काही मंडळींच्या जीवनात असमाधानकारक घटना घडतील. सत्य झाकण्यासाठी काही जणांकडून ढोंगी आचरण होणे संभवते. विविध कारणांनी अपेक्षित संततिसुख मिळणार नाही. शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात त्रास, मानहानी होणे संभवते. जपा. व्ययस्थानी असलेल्या हर्षलमुळे काहींची बेअब्रू होणे संभवते; तर काहींना वाईट, जिवावरच्या प्रसंगाला तोंड द्यावे लागेल. श्रद्धा असेल तर शिवोपासना करा.

**(३) मिथुन -** या महिन्याचा काळ या राशीच्या मंडळींना अस्वस्थ मनस्थितीत व्यतीत करावा लागेलसे दिसते. सतत मनाविरुद्ध घडणाऱ्या घटना, आर्थिक चिंता, अपयश अशापैकी कारणांनी गहरे नैराश्य येणे संभवते. शिवाय काही मंडळींना गलितगात्र होण्याइतका थकवा जाणवेल. जपा. काही मंडळींना कुसंगतीची बाधा होणे संभवते. तसेच बेचैन अवस्थेत मित्रद्रोह होणेही संभवते. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या मंगळामुळे अपघात भय आहे. म्हणून सतत सावधानतेने आचरण करा. तसेच या मंगळामुळे उष्णताविकाराचे आजार होणे संभवते. म्हणून अति तिखट पदार्थांचे सेवन करू नका. त्यामुळे मूळव्याधीचा आजार त्रस्त करील. जपा. वीज, पाणी यांपासून धोका असल्याने विजेची उपकरणे काळजीपूर्वक हाताळा. जलप्रवास करू नका. कौटुंबिक सुखासाठी शुक्र ग्रह अनुकुल आहे. या राशीच्या विदयार्थ्यांना शैक्षणिक प्रगती साधणे शक्य होणार असले तरी अपेक्षेइतकी प्रगती होईलसे वाटत नाही. पण नोकरी-व्यवसायात अस्थिर परिस्थितीच राहण्याची शक्यता वाटते. मित्रांशी वाद, भांडणे होणे संभवते. जपा. जन्म कुंडलीत योग असेल त्यांना अर्थलाभ होईल. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे मन:शांती मिळू शकेल. काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील; तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. श्रद्धेने श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना करा.

**(४) कर्क -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. म्हणून त्यांनी जे काय साधावयाचे ते महिन्याच्या

पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती प्रतकुल होण्याची दाट शक्यता आहे. मनाविरुद्ध घटना घडणे, मनस्थिती अस्वस्थ होणे, अवाजवी खर्च करावा लागणे अशामुळे नैराश्य येणे संभवते. मानहानी झाल्यास शारीरिक अनारोग्य होणेही संभवते. जपा. पण उच्च चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणाराना मात्र काळ अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला शनि ग्रह चिकित्सक बौद्धिक व्यवसाय असणारांना व लोखंड, कोळसा, यांचा व्यापार असणारांना पूरक असून असे व्यवसाय असणारांना लाभदायक होईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात काही मंडळीना वातविकाराचा आजार त्रस्त करील ; तर काहींना असह्य अपमान झाल्यामुळे संताप व चीड येईल. पण बुध- शुक्राच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे परिस्थिती आटोक्यात राहील. गुरु ग्रहाच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे कौटुंबिक सुखसमाधान मिळेल; पण नातेवाईक मंडळींपैकी कोणाकडून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या ज्या कोणास स्थावर खरेदी-विक्री करावयाची असेल त्यांना तसे व्यवहार सुखाने करता येतील. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या केतू व मंगळ ग्रहामुळे पतिपत्नीपैकी कोणाच्या तरी अनारोग्यामुळे तसेच दोघांतील वाद, गैरसमज, भांडणे अशापैकी कारणामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. विषभय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. तसेच जलभय असल्याने जलप्रवास करू नका. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे “ पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळींना नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल होईल. आर्थिक लाभ होतील व नवे मित्र मिळतील. सुखसमाधान लाभेल. पण सप्तम स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे काहीही कारणाने वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येण्याची शक्यता आहे. जपा. चिकाटीच्या बौद्धिक संशोधन कार्यास, तसेच वैद्यकीय उपचारसंबंधी संशोधन कार्यात कार्यरत असणारांना काळ प्रगतिकारक, यशदायक व समाधान देणारा असा सिद्ध होईल. पण या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे उष्णताविकाराचा आजार होणे संभवते. ताप येणे, इजा होणे, अपप्रचाराचा त्रास होणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. रक्तविकार, हृदयविकार असणारांनी विशेष जपावे. पण मंगळ ग्रहासह केतू असल्यामुळे परिस्थिती अटोक्यात राहील. या राशीच्या लेखकांचे लिखाण ग्रंथरूपाने प्रसिद्ध होईल. काही मंडळीना प्रवासाचे योग येतील. काहींना तर परदेशगमनाची संधी मिळेल. पण भावंडापैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता

दिसते. जपा. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात बुध ग्रह व्ययस्थानी गेल्यावर अनारोग्य होणे संभवते. तसेच हाती घेतलेल्या कार्यात अपयश येणे, मानहानी होणे अशापैकी घटना घडतील. पण शुक्र ग्रहामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व होणारा मनस्ताप सुसह्य होईल. राहूमुळे हितशत्रूपासून रक्षण होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना करा. दररोज नियमितपणे श्रीगणपति अथर्वशीर्षाचे पठण करा.

(६) **कन्या -** या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, यशदायक व उराशी बाळगलेली स्वप्ने साकार करणारा असा सिद्ध होईल. कौटुंबिक जीवनात सुखसमाधान लाभेल. स्वतंत्र व्यावसायिकांना व्यवसाय वाढीस काळ अनुकुल होईल. कुटुंबात शुभ घटना घडतील. पण माता असेल तर तिला कसला तरी आजार त्रस्त करील. त्यामुळे गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या मंगळ व केतुमुळे विविध कारणानी संततिसुखात बाधा येणे संभवते. मुलांपैकी कोणाचे अयोग्य आचरण, कोणाचे आजारपण अशापैकी कारणानी संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होतील. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. कामाचा किंवा जबाबदारीचा ताण असह्य झाल्यास अनारोग्य होणे शक्य आहे. जपा. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या शक्र ग्रहामुळे मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. ज्यांना स्थावर संपत्ती आहे त्यांनाही विविध कारणांनी मनस्ताप होणे संभवते. जपा. आर्थिक गुंतवणूक विचारपूर्वक करा. फसवणूक होणे संभवते. जपा. या राशीच्या काही मंडळींना काल्पनिक चिंता त्रस्त करतील. काही मंडळीना उगीचच आपल्याला काही आजार झाला असल्याची भावना त्रस्त करील. काही मंडळीना मोठ्या लोकांच्या ओळखीमुळे काही लाभदायक गोष्टींची भेट मिळेल. काहींना एखादे मानाचे स्थान तर काहींना प्रतिष्ठा प्राप्त होईल. एक महत्त्वाची गोष्ट सांगावीशी वाटते. ती म्हणजे सतत सावधानतेने आचरण करा. अकारण घाई करू नका. वाहन नियंत्रित वेगाने व लक्षपूर्वक चालवा. अपघात भय आहे. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना करा.

(७) **तुळा -** सध्या या राशीच्या मंडळींची मानसिक स्थिती अतिशय भावनाप्रधान झाली असावी असे वाटते. तसे असेल तर आध्यात्मिक उपासनेद्वारे मानसिक शक्ती प्राप्त करून घेणे सहज शक्य आहे. मात्र काल्पनिक चिंता करू नका. या राशीच्या प्रथम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे शारीरिक आरोग्य चांगले राहील. शिवाय हा गुरु उच्च बौद्धिक संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल. साहित्यिक लेखनास

अनुकुल होईल. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे या राशीच्या काही मंडळींना नवे कार्यक्षेत्र मिळू शकेल तर काहींना उत्तम असे नवे कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करीलसे दिसते. कौटुंबिक सुखाच्या दृष्टीने या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. गैरसमज, वाद, भांडणे, असमाधानकारक घटना यांमुळे मन अस्वस्थ राहण्याची शक्यता दिसते. कोणाशी पटणार नाही व अकारण संतप्त व्हाल. जपा. विषभय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. जीवनसाथीचे लहरी, विक्षिप्त आचरण, दोघांतील वाद, मतभेद, भांडणे अशापैकी कारणानी वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभणे कठीण दिसते. जपा. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी मनमोकळे वागून भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या नोकरदार मंडळींना तसेच सर्व प्रकारचे कलात्मक व्यापार-व्यवसाय असणारांना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात मानसिक व कौटुंबिक सुख समाधान लाभण्याची शक्यता आहे. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व प्रतिकुल परिस्थितीला टक्कर देण्याची क्षमता प्राप्त होईल.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळीना शनि ग्रहाच्या साडेसातीच्या प्रतिकुल काळाशी मुकाबला करावयाचा आहे. म्हणून त्यांनी या प्रतिकुल काळात सतत सहनशील बनून, मनावर संयम ठेवून व नम्रतेचे धोरण स्वीकारून आचरण करणेच हितावह होईल. तसे आचरण केल्यास होणारा मनस्ताप सुसह्य होईल. या महिन्याच्या काळात शारीरिक-मानसिक आरोग्य बिघडण्याची दाट शक्यता आहे. विशेष करून पोटाचे विकार बळावण्याची शक्यता अधिक दिसते. अकारण अति विचार करू नका. कारण आरोग्यदृष्ट्या हर्षल ग्रह प्रतिकुल असून तो डोकेदुखी, मेंदूविकार अशापैकी आजार निर्माण करील .जपा. कुटुंब स्थानी असलेल्या वक्री शनि ग्रहामुळे विविध कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा निर्माण होणे संभवते. त्यामुळे असह्य मनस्ताप होणे संभवते. जपा. घरगुती घोटाळे, गैरसमज अशापैकी कारणांनी गृहसौख्य मिळणेही संभवत नाही. अशा परिस्थितीत मंगळ ग्रहाच्या प्रभावामुळे प्रबळ महत्त्वाकांक्षा निर्माण होईल व प्रतिकुल काळाला टक्कर देण्याची उर्मी येईल. पण त्याचा परिणाम इजा, दुखापत होणाराच असेल. जपा. प्रवासाचे योग येतील. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच काही प्रमाणात अनुकुल होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे संभवते. मुलांपैकी कोणाच्या अनारोग्याची चिंता त्रस्त करील. जपा. मनासारखे काही घडत नसल्याने त्याचा परिणाम शारीरिक अनारोग्य होण्यावर होईल. जपा. अध्यात्मात रस असेल तर

उपासनेद्वारे मन खंबीर होईल व प्रतिकुल काळ सुसह्य होईल. बुध-शुक्र-गुरु या शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीहनुमान उपासना मन:शक्ती देईल. दररोज नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अत्यंत भावनाशील झाली असली पाहिजे. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तर लगेच गहरे नैराश्य येत असावे असे वाटते. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल, यशदायक व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धातील रवि ग्रह भाग्योदयकारक असल्याने काही लाभदायक घटना घडतील. हितशत्रू पराभूत होतील. पण शारीरिक अनारोग्य होणे संभवते. काही मंडळीना पोटविकाराचा तर काहींना हृदयविकाराचा त्रास होणे संभवते. तसेच काही मंडळीना उष्णताविकार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. घसा, मान, दाढा, डोळे यांपैकी कशाचे तरी अनारोग्य होणे संभवते. जपा. त्यात भर म्हणून जीवनसाथीच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करील जपा. कौटुंबिक जीवनात कोणाचे तरी स्थलांतर झाल्यामुळे विरहदु:ख सहन करावे लागण्याची शक्यता जाणवते. नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होतील. जपा. शिवाय अनपेक्षित रीत्या निर्माण होणाऱ्या आर्थिक समस्या त्रस्त करतील. जपा. आर्थिक देणे द्यावेच लागेल; पण आर्थिक येणे मात्र संभवत नाही. काहींच्या आर्थिक घडामोडीमध्ये घोटाळे निर्माण होतील. जपा. नेपच्यूनमुळे काहींना जलप्रवासाची तर काहींना परदेशगमनाची
संधी प्राप्त होईल. गुढविद्या, अध्यात्म यांत रुची असणारांना अनुक्रमे उपासनेद्वारे व संशोधन कार्यद्वारे मन:शांती व यश प्राप्त होईल. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना त्यांच्या नियोजित कार्यात यश मिळेल. जन्मकुंडलीत योग असेल तर अचानक धनलाभ होणेही संभवते. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. विवाहेच्छुना विवाहयोग संभवतो. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या काळात आपल्या संतापी, हटवादी व मानापमान फार असणाऱ्या स्वभावावर नियंत्रण ठेवून व सहनशील बनून नम्रतेचे आचरण करणेच सुखाचे होईल. त्यामुळे सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राहील व होणारा मनस्तापही सुसह्य होईल. कोठेही जाताना, वाहन चालविताना अतिशय सावधानता बाळगा. अपघात भय संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या

हर्षलमुळे आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही. कोणाशी पटणार नाही, सतत तक्रारी कराल. त्यामुळे गृहसौख्यात बाधा निर्माण होईल. जपा. नोकरीत वरिष्ठ अधिकाऱ्याचा त्रास सहन करावा लागेल. काही मंडळींना प्रिय जनांपासून दूरत्व सहन करावे लागेल. काहींना संततिविषयक समस्या त्रस्त करील. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल होईल. कार्यसिद्धी होईल. धनलाभ होणेही संभवते. सप्तम स्थानी असलेल्या राहूमुळे प्रेमिकांच्या प्रेमविश्वात बाधा येणे संभवते. तसेच इतरांच्या जीवनातील वैवाहिक सुखात अनेक कारणांनी बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या दसम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना

काळ अनुकुल व लाभदायक होईल. वरिष्ठ अधिकारी कामाचे कौतुक करतील. काहींना नवे आवडते कार्यक्षेत्र प्राप्त होईल. पण या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे अनपेक्षित संकटे निर्माण होतील. असह्य मनस्ताप होणे संभवते. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्यामुळे सतत सावधानतेने विचारपूर्वक आचरण करा.

श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे "ओम नम:शिवाय" मंत्राचा जप करा व श्रीहनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अतिशय कोमल झाली असावी, असे वाटते. तसे असेल तर मानसिक संवेदनाही अति शीघ्र होत असतील. त्यामुळे मनाविरुद्ध थोडेही काही घडले तर लगेच गहरे नैराश्य येत असावे, असे वाटते. काही मंडळींचा स्वभाव अतिशय लहरी होणेही संभवते. या महिन्याच्या काळात कौटुंबिक जीवनात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता दिसते. शिवाय कौटुंबिक अन्य प्रकारचा त्रास, नियोजित कार्यात होणारी दिरंगाई, अनारोग्य, आणि आर्थिक समस्याही त्रस्त करतील. काही मंडळींना कर्जफेडीची चिंता त्रस्त करील. नोकरीत वरिष्ठ अधिकाऱ्याचा जाच सहन करावा लागेल. उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना तसेच शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणाराना काळ प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या व्यावसायिकांना इतर जातिधर्मीय ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. या राशीच्या कलात्मक नोकरी-व्यवसाय असणाऱ्या मंडळींना योग्यता व अनुभव असूनही कर्तृत्व सिद्ध करण्यास योग्य संधीच मिळत नसल्याने नैराश्य येणे संभवते. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल व सात्विक सुखसमाधान लाभेल. काही मंडळींना कीर्ती, प्रसिद्धी मिळणेही संभवते. प्रवासाचे योग येतील. लाभस्थानी असलेला शनि ग्रह चिकाटीचा गुण आवश्यक असलेल्या कार्यक्षेत्रातील मंडळींना अनुकुल होईल व लाभदायकही होईल.

पण संततीपैकी कोणास कसला तरी त्रास होत असल्याने संततिसुखात बाधा येणे संभवते. मंगळ ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असून वाद, गैरसमज, अनारोग्य , आर्थिक चिंता, मानहानी अशापैकी घटनांनी असह्य मनस्ताप देईल. म्हणून सतत मनावर व जिभेवर ताबा ठेवून सहनशीलतेचे आचरण करा. श्री हनुमानाची उपासना करा. दररोज नियमितपणे “हनुमानचालिसा “ स्तोत्राचे पठण करा. त्यामुळे मन:शांती लाभेल.

**(१२) मीन -** मानसिक व्यग्रता, चिंता, नैराश्य, अति अस्थिर विचार व अविचारी आचरण अशापैकी कारणांनी या राशीच्या मंडळींकडून नको ते घडण्याची शक्यता आहे. जपा. आपल्या जिभेला लगाम घाला. नपेक्षा आपल्या फटकळ, अविचारी बोलण्याने समोरची माणसे दुखावली जातील व त्यामुळे असलेले चांगले संबंधही तुटले जातील. जपा. अविचाराने खर्च होणेही संभवते. या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्ध अतिशय अनुकुल व यशदायक असल्याचा अनुभव येईल. वरिष्ठ आपल्या कामावर खूष होतील. काही मंडळींना बढती, काहींना एखादे उच्च पद किंवा मानाचे स्थान मिळणे संभवते. त्यामुळे जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करा. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती बदलण्याची शक्यता आहे. नियोजित कार्यात दिरंगाई होणे, कौटुंबिक समस्या त्रस्त करणे, त्यामुळे स्वत:चे आरोग्य बिघडणे, आकस्मिक खर्चाची समस्या उद्भवणे, महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात मुलांपैकी कोणाकडून तरी मनस्ताप देणारे आचरण घडण्याची शक्यता दिसते. अशापैकी काही घडले तर नैराश्य येणे संभवते. . जपा. कमिशन, दलाली व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. तसेच चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, कोळसा, लोखंड व्यापारी यांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. कसल्याही लाभाची अपेक्षा न करता कलात्मक छंद - गायन,वादन, चित्रकला, फोटोग्राफी वगैरे - जोपासत असणारांना सात्विक सुखसमाधान लाभेल. जन्मकुंडलीत योग असेल तर काही मंडळींना अचानक धनलाभ किंवा वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. मंगळ ग्रहामुळे मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. पण याच मंगळ ग्रहामुळे योग असेल तर एखाद्या मौल्यवान वस्तूचा लाभ होणेही शक्य दिसते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

=====ooooo0ooooo=====